पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क्रमांक/आ.कक्ष/ कावि/१५२/२०१६
दिनांक :- ६/१०/२०१६

कार्यालयीन आदेश

महानगरपालिकेस विविध स्त्रोतातून उत्पन्न प्राप्त होत राहते. तसेच महानगरपालिकेतून विविध प्रकारची प्रदाने विविध कामासाठी वेगवेगळ्या विभागातून प्रस्तावित करणेत येतात. प्राप्त होणा-या उत्पन्नावर तसेच प्रदान करणेत येणा-या विविध देयकांच्या रकमेवर विविध कर, शुल्क, फी, यांची कपात करणे आवश्यक असते. हा कर, शुल्क, फी, कपात करणेत न आल्यास त्याबाबतचा अर्थिक भुर्दंड पडू शकतो. तरी उत्पन्नासबंधी रक्कमा ज्या विभागाकडून गोळा करणेत येतात. तसेच प्रदाना सबंधी देयके/ प्रस्ताव ज्या विभागांकडून सादर करणेत येतात त्यांनी असे उत्पन्न स्विकारताना तसेच अशा प्रदानांचे प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करतांना सर्व प्रकारच्या कपाती तसेच कर, शुल्क,फी याची वजावट दर्शवुनच प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेचे उत्पन्न स्विकारणारे अधिकारी तसेच प्रदानांचे प्रस्ताव सादर करणा-या अधिका-यांनी करावयाच्या कपाती बद्दल खातरजमा करूनच ही कार्यवाही करावयाची आहे. याची जबाबदारी उत्पन्न स्विकारणारे अधिकारी तसेच प्रदानासाठी देयके/ प्रस्ताव सादर करणारे अधिकारी यांची राहील याची नोंद घ्यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत कार्यवाहीसाठी-
सर्व खातेप्रमुख